CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. ३ जून २०२३ | ▶ वर्ष : २१ वे ▶ अंक : २४४ वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८


## महसूल कर्मचाऱ्यांमध्ये बदल्यांची लगबग

✔ **सोलापूर :** महसूल अर्थात जिल्हाधिकारी कार्यालयातील पात्र कर्मचारी बदल्यांच्या प्रतीक्षेत असून येत्या दोन तीन दिवसात बदल्याबाबत आदेश काढला जाणार आहे. त्यामुळे प्रशासनात बदल्यावी लगबग दिसून येत आहे. एक महिन्याची जरी मुदत असलीतरी लवकर ऑडर काढली जाणार असल्याची माहिती अशी माहिती प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी दिली.दरवर्षी ३१ मे रोजी महसूल कर्मचाऱ्यांच्या बदल्या होत असतात. परंतु यंदा शासनाने ३० जूनपर्यंत बदल्या करण्यास मुभा दिली आहे. त्यामुळे अपेक्षेप्रमाणे आद्याप बदल्या झाल्या नाहीत.२८ मंडल अधिकारी, ५४ अव्वल कारकून आणि ७२ महसूल सहायकांचा बदल्यांमध्ये समावेश आहे. बदल्यांची यादी तयार असून त्यावर अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

## डोक्यात वीट पडल्याने मजुराचा मृत्यू

✔ **सोलापूर :** शहरातील बेगमपेठ येथे बांधकाम करताना डोक्यात वीट पडल्याने जाहीर अब्बास लालसाब जहागीरदार (वय ३४ रा. गैबीपीर झोपडपट्टी, होटगी रोड) हे मजूर गंभीर जखमी होऊन मरण पावले. ही दुर्घटना शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली. जाहीरअब्बास हे बेगम पेठ येथील बेगमबी मस्जिद परिसरातील बांधकाम करीत होते. दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास काम करत असताना अचानक भिंतीवरील वीट डोक्यात पडल्याने ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना जखमी अवस्थेत प्राथमिक उपचार करून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापूर्वी मयत झाले. या घटनेची नोंद जेलरोड पोलिसात झाली आहे. काम करत असताना दुर्घटना घडल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

# माढ्याच्या खासदारांची भलतीच 'करणी' सातारा-सोलापूरला मिळणार हक्काचे 'पाणी'

▶ पाणी पळवणाऱ्या बारामतीकरांना वेसण घालण्याचा 'डाव' अखेर यशस्वी

▶ सरकारकडून ३१०० कोटी रुपयांचा निधी मंजूर, कामालाही आरंभ

✔ सुराज्य/सोलापूर

**'नीरा देवधर धरणांच्या अपूर्ण कालव्यांची कामे पूर्ण करण्यासाठी लवकरच निविदा प्रक्रिया सुरू केली जाणार असल्याने सुमारे वीस वर्षांपासून बारामतीने पळविलेले हक्काचे पाणी सोलापूर आणि साताराच्या दुष्काळग्रस्त भागांना देणे शक्य होणार आहे,' असा दावा माढ्याचे खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी केला आहे.**



'कालव्याच्या अपूर्ण कामांसाठी ३१०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. पैकी ५०० कोटींच्या निविदा प्रक्रिया येत्या दोन दिवसांत सुरू होणार आहेत. आगामी तीन वर्षांत कालव्याचे काम पूर्ण होणार आहे. त्यामुळे बारामती, इंदापूरला पळविलेले पाणी पुन्हा सातारा जिल्ह्यातील खंडाळा, फलटण, माण, खटाव; तसेच सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस, पंढरपूर या तालुक्यांना पुरविले जाणार आहे,' असे माढा मतदारसंघाचे खा.रणजितसिंह निंबाळकर यांनी दै.सुराज्य शी बोलताना स्पष्ट केले.

माढालोकसभामतदारसंघातील विविध सिंचन प्रकल्पांची सद्यस्थिती आढावा घेण्यासाठी आज सिंचन भवनात सोलापूर आणि सातारा जिल्ह्यातील आमदारांची बैठक झाली. त्यात पाणी वितरणासह इतर गोष्टींचा आढावा घेवून माढा मतदारसंघातील सर्व तालुक्यातील शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी मोठा निधी उपलब्ध झाल्याने येत्या दोन ते अडिच वर्षांमध्ये बारामती आणि इंदापूरला पळविलेले पाणी पुन्हा सोलापूर जिल्ह्यातील भागांमध्ये वळवण्यात येईल. हक्काचे पाणी सातारा, सोलापूरच्या दुष्काळग्रस्त भागांना देणे शक्य होणार.

**- रणजितसिंह निंबाळकर,**
खासदार, माढा

**पुण्याच्या पाण्यासाठी नवा पर्याय? :** 'पुण्यावर भविष्यात पाणी कपातीचे संकट येऊ नये, यासाठी नीरा देवघर धरणाच्याजवळ शिवथरघळ येथे अडीच टीएमसी क्षमतेचे नवे धरण बांधण्याचा निर्णय़ सरकारने घेतला आहे. या धरणाच्या कामासाठी एक हजार कोटी रुपयांचा खर्च आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार धरणासाठी सर्वेक्षण करण्यात आले आहे. नीरा देवघर धरणातील पाणी कोकणात जात असल्याने ते अडविण्यासाठी कोकण विकास महामंडळाचे 'ना हरकत' प्रमाणपत्र घेण्यात आले आहे. या धरणाचे पाणी नीरा देवघर धरणात सोडून ते बारामती, इंदापूरसाठी देता येईल,' असेही निंबाळकर म्हणाले.

**नेमके प्रकरण काय? :** 'नीरा देवघर ध रणातून पुण्यासह सातारा, सोलापूर या तीन जिल्ह्यांसाठी सुमारे १२.९८ दशलक्ष घनफूट (टीएमसी) एवढे पाणी वापरले जाते. नीरा देवघर धरणाच्या कालव्याचे काम अपूर्ण राहिल्याने धरणातील सात टीएमसी पाणी बारामती, इंदापूरला वळविण्यात आले होते. हे अतिरिक्त पाणी बारामतीतील शेतीसह उद्योगधंद्यांना दिले जाते. सोलापूर,सातारच्या हक्काचे पाणी मागीतली वीस वर्षांपासून बारामतीकर वापरत आहेत. त्यामुळे गेल्या वीस वर्षांपासून हक्काचे पाणी मिळविण्यासाठी सोलापूर,सातारा या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी संघर्ष सुरू केला. आता कालव्याचे काम पूर्ण होणार असल्याने बारामतीचे पाणी बंद होईल,' असेही निंबाळकर यांनी बोलताना स्पष्ट केले.

## महाळुंगच्या राज ग्रो कोल्ड स्टोरेजला आग

### दीड हजार टन बेदाणा, ५०० टन सोयाबीन जळून राख

✔ सुराज्य/श्रीपूर

श्रीपूर जवळील महाळुंग रोडवर असणाऱ्या घोगरे यांच्या राज ग्रो कोल्ड स्टोअरेजला सोमवारी सायंकाळी ६.२० च्या सुमारास अचानकपणे आग लागून त्यात ४० कोटींच्या मालमत्तेची हानी झाली आहे. धुराचे काळसर लोळ आकाशात मोठ्या प्रमाणात दिसल्यानंतर श्रीपूर, महाळुंग परिसरातील नागरिकांनी धाव घेतली.

या कोल्ड स्टोरेजचा उपयोग शेतीमाल साठवून ठेवण्यासाठी केला जातो. या कोल्ड स्टोअरेजची ७ हजार मे.टन साठवण क्षमता असून यामध्ये ५ हजार मे.टन व २ हजार मे. टन एवढ्या क्षमतेचे दोन कोल्ड स्टोअरेजची उभारणी करण्यात आली आहे. त्यापैकी २ हजार मे. टन क्षमतेच्या नवीन कोल्ड स्टोअरेजला आग लागली. त्यामध्ये १५०० टन बेदाणा व ५०० टन सोयाबीन ठेवण्यात आले होते. त्यापैकी बेदाण्याची किंमत सुमारे २० कोटी रुपये व सोयाबीनची किंमत सुमारे १० कोटी रुपये व कोल्ड स्टोअरेजची जळीत झालेली मालमत्ता १० कोटी रुपये असे एकूण ४० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे राज ग्रो कोल्ड स्टोअरेजचे व्यवस्थापकीय संचालक स्वप्निल घोगरे यांनी सांगितले.



आग लागलेल्या नवीन युनिट कोल्ड स्टोअरेजमध्ये बेदाणा, सोयाबीन माल शेतकऱ्यांचा ठेवला होता. अचानक लागलेल्या आगीमुळे सर्वत्र धावपळ उडाली. सुरुवातीला तेथील कामगारांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला पण आगीने रौद्र रूप धारण केल्याने आग विझवणे अवघड झाले. लागलेल्या आगीत कोणतीही मनुष्यहानी झालेली नाही. पण कोल्ड स्टोअरेजमध्ये ठेवलेल्या शेतकऱ्यांचा माल जळून जाऊन अंदाजे ४० कोटी रुपयांचे नुकसान झाले असल्याचे दिसून आले आहे.

कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना टेंभुर्णी, अकलूज नगरपरिषद, सहकार महर्षी कारखाना अकलूज, पंढरपूर नगरपरिषद या अग्निशमक दलाच्या गाड्यांसह अनेक टँकरने आग विझवण्याचे प्रयत्न झाले. पण उशिरापर्यंत आग विझवण्यासाठी शर्तीचे प्रयत्न सुरू होते. कोल्ड स्टोअरेजला सदर आग ही कशामुळे लागली हे मात्र कळू शकले नाही.

## नागणसूर येथे मारहाणीत जखमी वृद्धेचा मृत्यू

✔ **सोलापूर :** नागणसूर (ता.अक्कलकोट) येथे पूर्वीच्या भांडणावरून वृद्ध महिलेस काठी, दगड आणि लाथाबुक्क्याने मारहाण करून गंभीर जखमी करण्यात आले होते.ती महिला सोलापुरातील खासगी रुग्णालयात उपचार घेताना गुरुवारी मरण पावली. ही घटना नागणसूर येथे ३० मे रोजी रात्रीच्या सुमारास घडली होती.

कमलाबाई मलकण्णा तिग्गीनकेरी (वय ७० रा.नागणसूर) असे मयत महिलेचे नाव आहे. मंगळवारी सायंकाळी हा प्रकार घडल्यानंतर त्यांना अक्कलकोट येथे खासगी उपचार करून बेशुद्ध अवस्थेत सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.त्यानंतर दुसऱ्या दिवशी त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारा दरम्यान त्या मयत झाल्या. त्यांना महेश सूर्यकांत तिग्गीनकेरी, रमेश तिग्गीनकेरी, सूर्यकांत तिग्गीनकेरी आदींनी त्यांना मारहाण केली होती.

## दहावीचा सोलापूर जिल्ह्याचा निकाल ९६.०६ टक्के

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्याचा इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल शुक्रवारी दुपारी ऑनलाईनने जाहीर करण्यात आला असून त्यात सोलापूर जिल्ह्याचा ९६.०६ टक्के निकाल लागला असल्याची माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

जिल्ह्यात एकूण ६२ हजार ८०२ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती तर त्यातील ६० हजार ३२८ विद्यार्थी पास झाले आहेत. यामध्ये मागील वर्षाप्रमाणेच यंदाच्या वर्षी मुलांपेक्षा मुलींचे पास होण्याचे प्रमाण जास्त आहे. या परीक्षेसाठी एकूण ३४ हजार ०३३ मुलांपैकी ३२ हजार २०९ मुले पास झाली असून हे प्रमाण शेकडा ९४.६२ टक्के इतके आहे. तर २८ हजार ७६९ मुलींपैकी २८ हजार ११९ मुली पास झाल्या आहेत.



हे प्रमाण ९७.७४ टक्के इतके आहे. एकूण पास विद्यार्थ्यात गुणवत्तेत २३ हजार ६४२, प्रथम श्रेणीत २२ हजार ७२४, द्वितीय श्रेणीत ११ हजार ६९५ तर पास श्रेणीत २ हजार २६७ विद्यार्थी आहेत. दहावी रिपिटर विद्यार्थ्यांमध्ये यावर्षी सर्वात मोठी आकडेवारी होती. त्यामध्ये जवळपास २८% विद्यार्थी नापास झाले आहेत. परीक्षेला रिपिटर विद्यार्थी बसलेल्यांची संख्या सोलापुरात ११७० इतकी होती. यापैकी ८२४ विद्यार्थी पास झाले आहेत. हे प्रमाण शेकडा ७०.४२ टक्के इतके आहे त्यामुळे रेग्युलर विद्यार्थ्यांपैकी रिपिटर विद्यार्थ्यांमध्ये नापास होण्याचे प्रमाण अधिक आहे.

## ४ हजारांची लाच घेताना पोलीस हवालदार ॲन्टी करप्शनच्या जाळ्यात

✔ सुराज्य/सोलापूर

आरोपीकडून ताब्यात घेतलेली मोटरसायकल तक्रारदाराला परत करण्यासाठी चार हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याबद्दल पोलीस हवालदारा विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

एमआयडीसी पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार इस्माईल इब्राहिम बागवान असे गुन्हा दाखल झालेल्या पोलिसाचे नाव आहे. तक्रारदार व तो काम करत असलेल्या ठेकेदार यांच्यामध्ये आर्थिक देवाण-घेवाणीचा वाद होता. त्यातून ठेकेदाराने तक्रारदाराची मोटार सायकल जबरदस्तीने नेली होती. त्यामुळे तक्रारदाराने एमआयडीसी पोलीस ठाण्यात ठेकेदाराविरुद्ध तक्रार देण्यासाठी धाव घेतली. त्यावेळी तेथील पोलीस हवालदार बागवान यांनी तक्रारदाराची तक्रार ऐकून घेऊन सदरची मोटारसायकल ठेकेदाराच्या ताब्यातून घेतली आणि ती एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या आवारात आणून ठेवली. तक्रारदाराने सदरची मोटारसायकल परत मिळण्यासाठी पोलीस हवालदार बागवान यांना विनंती केली असता बागवान यांनी त्यासाठी चार हजार रुपयांच्या लाचेची



मागणी केली. त्यामुळे तक्रारदाराने लाच लुचपत प्रतिबंधक खात्याकडे लाच मागणीची तक्रार नोंदवली.

त्यानुसार ४ मे रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने या तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी केली असता पोलीस हवालदार बागवान यांनी कोणतीही कारवाई न करता मोटारसायकल ताब्यात देण्यासाठी पोलीस हवालदार बागवान यांनी चार हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून तब्बल एक महिन्यानंतर पोलीस हवालदार बागवान यांच्याविरुद्ध लाच मागणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त गणेश कुंभार,पोलीस निरीक्षक चंद्रकांत कोळी, पोलीस अंमलदार नरोटे, किणगी यांनी केली आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आता धावाधाव कॉलेजच्या अडमिशनसाठी.. !


कल्याण
157-37-179

मेन बाजार
688-20-569


## दिल्ली दरबारी सोलापूरच्या 'सुंद्री'ला मोठा बहुमान...

### मास्टर व्यंकटेशकुमारला मिळाले सीसीआरटीचे ॲवार्ड

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापुरातील सुंद्री वादनातील अगदी लहान कलावंत मास्टर व्यंकटेशकुमार जाधव याला या कलेसाठी भारत सरकार सांस्कृतिक स्त्रोत एवं प्रशिक्षण केंद्र सांस्कृतिक मंत्रालय नवी दिल्ली यांच्या वतीने सांस्कृतिक प्रतिभा शोध शिष्यवृत्ती (सीसीआरटी ॲवार्ड) जाहीर करण्यात आली आहे.

या मंत्रालयाच्या वतीने १० ते १४ वयोगटातील कलावंतांना संगीत सेवेबद्दल ही शिष्यवृत्ती दिली जाते.देशातील सुमारे आठशे बालकलावंतांमधून व्यंकटेशकुमारच्या माध्यमातून सोलापूरला हा बहुमान पहिल्यांदाच मिळाला आहे.

सोलापूरच्या जाधव कुटुंबातील पाचव्या पिढीचे बाल कलाकार म्हणून ओळखले जाणारे व्यंकटेशकुमार हा पंडित भिमण्णा जाधव यांचा मुलगा आहे. सध्या दमाणी विद्या मंदिर येथे इयत्ता



७ वी मध्ये शालेय शिक्षण घेत आहे. सुंद्रीवाद्य हे अत्यंत दुर्मिळ वाद्य असून मूळचे सोलापूरचे असलेले हे वाद्य संगीत जगात प्रतिष्ठित करण्याचा प्रयत्न जाधव कुटुंबाकडून केला जात आहे. मास्टर व्यंकटेशकुमार हा आपले वडील पं.भीमण्णा यांच्याकडून सुंद्री वादनाचे धडे घेत आहे. त्याला ॲवार्डचा मिळालेला हा बहुमान म्हणजे चिकाटी आणि संगीत क्षमता याची जणू पावती आहे,असे म्हणावे लागेल. भारत सरकारने सुरू केलेल्या या शिष्यवृत्तीचा उद्देश संगीत, नृत्य, नाटक आणि बरेच काही यासह विविध कला प्रकारांमधील तरुण प्रतिभांना प्रोत्साहन देण्याचा आहे. केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीने संगीत केलेला प्रोत्साहन देण्यासाठी ही शिष्यवृत्ती दिली जाते. देशभरातून त्यासाठी लाखो अर्ज आले होते.त्यात सुमारे आठशे कलावंतांना प्राधान्य देण्यात आले.त्यात व्यंकटेशकुमारची निवड झाल्याने सोलापूरच्या कला क्षेत्रात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

**देशभरात वादन... :** आजपर्यंत मास्टर व्यंकटेशकुमार याने मध्यप्रदेश कलापरिषद- भोपाळ, भारत सरकार संगीत नाटक अकादमी आयोजित जागतिक संगीत दिनानिमित्त दुर्लभ संगीत समारोह नवी दिल्ली, कलबुर्गी कल्याण उत्सव- कर्नाटक, सुंद्रीसम्राट संगीत महोत्सव, - सोलापूर आकाशवाणी, मुंबई दूरदर्शन, धारवाड उत्सव, रामकृष्ण संगीत महोत्सव - कोलकत्ता, अशा अनेक ठिकाणी सुंद्री वादनाची कला सादर करून सोलापूरचे नांव सांस्कृतिक क्षेत्रात उज्ज्वल केले आहे.

## पगारीचे पैसे मागितल्याने मारहाण; दुचाकीची तोडफोड

✔ **सोलापूर :** दोन महिने थकीत पगारीचे पैसे मागितल्याच्या कारणावरून दगडाने मारहाण करून दुचाकीची तोडफोड करण्यात आली. ही घटना महुद (ता. सांगोला) येथे बुधवारी रात्रीच्या सुमारास घडली. प्रशांत तुकाराम पाटील (वय ३२ रा.महुद) असे जखमीचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सागर उत्तम जुगादार (रा. गार्डी ता.पंढरपूर ) याच्याविरुद्ध सांगोल्याच्या पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. प्रशांत पाटील यांनी सागर याला दोन महिन्याचे पगाराचे पैसे मागितले होते. तुझे कसले पैसे असे म्हणत त्याने दगडाने तोंडावर मारहाण केली . त्यानंतर त्यांच्या दुचाकीची तोडफोड करून ५ हजारांचे नुकसान केले. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार भरमशेट्टी पुढील तपास करीत आहेत.



CMYK